# भाऊचा धक्का

पाच जून १९८५.
आम्ही सर्वसंगपरित्याग करून निघालो होतो! स्वर्ग किंवा मोक्ष काय तो दोन मिनिटं उरला होता. फक्त तो मोक्ष की कपाळमोक्ष ह्याची अद्याप खात्री नव्हती. सुखात चाललेला नोकरीधंदा, घरदार, आईबाप, मुलंबाळं सगळं काही मागे सोडून आम्ही दोघं सौदी अरेबियाला चाललो होतो. यात्रेकरूंपाशी असतात तशीच कमीत कमी सामानाची दोन बोचकी आणि त्यावेळच्या मायबाप सरकारने दोघात मिळून दिलेले शंभर रियाल इतकंच होतं गाठीला! आणि आता विमान रियाधला उतरत होतं.

आमच्याबरोबर आमच्याचसारखे नवखे, कावरेबावरे असे आणखीही लोक होते. एक सिंधी इंजिनीयर, एक मल्याळी नर्स, एक तामीळ आहारतज्ज्ञ, एक कानडी फिजियोथेरपिस्ट, दोन गुजराती डॉक्टर्स वगैरे मिळून एकूण आणखी दहा भारतीय आमच्याच विमानाने, आमच्याच हॉस्पिटलला जायला निघाले होते. मुंबईपासूनच "सोबत झाली," म्हणून घरच्यांनाही हायसं वाटलं होतं. अठरापगड भाषांच्या खिचडीमुळे भारताच्या अनधिकृत राष्ट्रभाषेत, म्हणजे इंग्रजीत, संवाद चालला होता. आम्ही जात होतो त्या गावाचं नाव एजंटाने सांगितलं होतं,
"उम्म खद्रा.  म्हणजे हिरवाईची आई. हिरवंगार ओयासिस आहे ते! भाग्यवान आहात तुम्ही!"
त्याने आमच्या वाळूमय स्वप्नांत हिरवा रंग भरला. पण घरी असलेल्या जगाच्या नकाशात काही ते नाव नव्हतं. मग एक जंगी, नकाशाचा बाप विकत घेतला. त्याच्यात ह्या आईच्या नावाचा एक थेंब सापडला. आमच्या समाधानाचं मडकं भरायला तो पुरेसा झाला.

"रियाधला हॉस्पिटलचा कुणीतरी माणूस तुम्हाला घ्यायला येईल," असं एजंटाने सांगितलं होतं. घ्यायला येणाऱ्या माणसाकडे द्यायला एजंटाने आम्हाला प्रत्येकी एक मोठा लखोटा दिला होता. त्यात आमची सगळी महत्त्वाची कागदपत्रं, ओरिजिनल सर्टिफिकेटं, त्यांची अरबी भाषांतरं, सगळं काही होतं. रियाधला विमानातून उतरल्यावर आम्ही सगळे घोळका करून त्या कुणा एका घ्यायला येणाऱ्याची वाट पहात उभे होतो. आमच्या बॅगा हलक्याच होत्या. पण बाकीचे बोटं मोजत, हातवारे करत, हमालांशी घासाघीस करत खाणाखुणांनी दरखोरी करत होते. हमालाने पैसे मागताना दहाही बोटं फैलावली. ती बोटं हलालांसाठी(लहान किंमतीचं सौदी नाणं) नसून रियालांसाठी आहेत हे जेव्हा समजलं तेव्हा खरी हलाखीची जाणीव झाली.

"असू दे. आत्ता पोचल्यावर मिळतीलच आपले पैसे. तसं कॉंट्रॅक्टच आहे आपलं," सारवासारव चालूच राहिली.

इतक्यात एक अरबी पोषाखातला हमाल आला. आमच्या दोघांच्या लहानखुऱ्या बॅगा उचलून कस्टम्सकडे झपाझप चालायला लागला. आणि म्हणाला,

"याल्ला!"

यापूर्वी हा शब्द फक्त मन्ना डेच्या गाण्यात ऐकला होता. त्याचा इथे संदर्भ लागेना. बाकीच्या लोकांची हमालांशी घासाघीस चालूच होती. त्यांनीही पट्कन बोली ठरवली आणि निघाले.

कस्टम्सवाल्यांनी सगळयांच्या बॅगांची कसून झडती घेतली. आमच्या दोघांच्या सामानात आक्षेपार्ह असं काहीच नव्हतं. एकच गणपतीची कीचेन चुकून आली होती. आमच्या डोळयांसमोर तिचं कचऱ्याच्या टोपलीत विसर्जन झालं.

बाकीच्यांच्या सामानात देवांचे फोटो, मूर्ती होत्या. त्यांनाही कचऱ्यातळी समाधी मिळाली. कुणाकडे मासिकं, पुस्तकं होती. त्यांच्यातले बायकांचे फोटो धुंडून, त्यातल्या उघड्या भागांवर काळया शाईचा बुरखा चढवला गेला. त्यामुळे ते भाग अधिकच उठावदार झाले. .

त्या अरबी हमालाने पुन्हा आमच्या बॅगांचा कब्जा घेतला. मग आणखी एक अरबी माणूस आला. त्याने हॉस्पिटलचं, अरबी ओळखपत्र काढून दाखवलं. आम्हाला फक्त त्याच्यावरचा सौदी स्वास्थ्यमंत्र्यांचा शिक्का कळला! आमच्या हातातले ते महत्वाचे लखोटे काढून घेऊन आमचं कागदोपत्री वस्त्रहरण करायचा त्याचा हक्क त्याने तत्काळ गाजवला आणि म्हणाला,

"याल्ला."

आणि तो त्या अरबी हमालाच्या मागून निघाला.

"म्हणजे ‘याल्ला’ म्हणणारा काहीतरी घेऊन जात असावा, मग ते ‘दिल’ असो, सामान असो की लखोटे असोत!"हे तर्क करत कुजबुजले.

ते दोघे आम्हाला एका मोठ्या सबर्बन गाडीकडे घेऊन गेले. आमचे पासपोर्ट अजून आमच्या हातात होते. त्या हॉस्पिटलवाल्याने तेही आता काढून घेतले. याची खरंतर आम्हाला आधीपासून कल्पना दिलेली होती. पण तरीही असं आमचं कागदोपत्री अस्तित्व, आमची ऑफिशियल ओळख, आमचं मीपणच हिरावल्यावर काळजाचा ठोका चुकलाच. मनात पालही चुकचुकली क्षणभर. विरक्ती सोपी नाही!

"याल्ला याल्ला सब ले गया," आमच्यातल्या गडानीला कंठ फुटला. कुणीतरी त्याला गप्प केलं.

त्या सबर्बनमध्ये बारा सीट्स होत्या. आम्हीही बाराजण होतो. पण शिवाय हा येवढा थोरला सामानाचा पसारा सोबत होता ना! तो कसाबसा मागल्या जागेत कोंबल्यावर बसायला आठच जागा उरल्या. तेवढ्यात आम्ही शिकस्त करून, कुस्करून, घोळून बसलो.

बाकीच्यांचे हमाल पैसे मागायला आले. आमचा कुठे दिसेना. बाकीच्या हमालांना विचारलं तर काहीतरी अस्पष्ट, बेफिकीर अरबी उत्तर आलं.

मधल्या काळात आम्हा चुकल्या कोकरांचा तो मेंढपाळ कुठेतरी जाऊन आला. परत आला तेव्हा त्याच्या हातात आमचे लखोटे, पासपोर्ट, काही नव्हतं. कुठे टाकले ते याने? त्याला विचारलं, अर्थातच इंग्रजीत. त्याने उत्तरादाखल मख्ख चेहऱ्याने

आमच्यातून आरपार बघितलं, पुन्हा एकदा म्हणाला, "याल्ला!" आणि गाडी सुरू झाली.  जीव धास्तावला. पण काय करणार? तरीही न राहवून मी त्याच्यापाशी त्या हमालाची चौकशी केली. मिटल्या तोंडाने, त्याने फक्त मानेला एक हिसडा दिला. शेवटी त्या हमालाचे, गरिबाचे पैसे द्यायचे राहिलेच. मनाला रुखरुख लागून राहिली.

आम्ही अवघडून , मेंढरांसारखे कोंबून बसलो होतो. ‘packed like sardines’ मधल्या सार्डीन्सची दुःखं जाणवत होती.
आतापर्यंत निर्जीव वाटणाऱ्या सामानात गाडी सुरू झाल्याबरोबर जीव संचारला. गाडीच्या आचक्यागचक्यांच्या ठेक्यात त्याने आम्हाला वरून, मागून गुद्दे आणि बुक्के हाणायला सुरुवात केली. उन्हाळ्याचे दिवस. गाडी सुरू झाल्यावर कोरड्या, गरम झळा मारायला लागल्या. काहिली व्हायला लागली.

"अरेच्चा! गाडीच्या खिडक्या उघड्याच राहिल्या की!"

"खिडक्या लावा ना! त्या ड्रायव्हरला सांगा, म्हणावं खिडक्या उघड्याच राहिल्या आहेत."

"गाडी वेगात जायला लागली की सामान पडेल ना बाहेर! खिडक्या लावा रे कुणीतरी."
बरीच हाकाटी झाली त्या खिडक्यांच्या नावाने. मग त्या लावण्यासाठी भगीरथ प्रयत्न झाले. सरतेशेवटी एक खळबळजनक शोध लागला,

"आपल्या या गाडीच्या खिडक्यांना काचाच नाहीत!"

मागून ढकलणाऱ्या सूटकेसने माझं मस्तक बळीराजाच्या मस्तकासारखं नमवून ठेवलं होतं. एक हात शेजारच्या नर्सच्या पाठीमागे अडकला होता. दुसरा हात एकंदर तोल सावरण्यासाठी अत्यावश्यक म्हणून समोरच्या सीटच्या पाठी टेकवला होता. तो तिथून काढला असता तर माझा तोल जाऊन मी ह्यांच्या अंगावर कोसळले असते. या नर्स मुली अशी केसांची अस्ताव्यस्त झुलपं का ठेवतात कोण

जाणे! उघड्या खिडकीतून येणाऱ्या गरम झळांनी माझ्या शेजारणीच्या तसल्या मोकळया बटा माझ्या नाकाशी हुळहुळत होत्या. त्या तिच्या बटा माझ्या नाकावरून दूर सारायला मला मोकळा हातही नव्हता. शिंकायचीही चोरीच होती.

न जाणों, तेवढ्या तडाख्याने एखादी बॅग उडून खिडकीतून बाहेर जायची.

"ती बघा उम्म खद्राची पाटी!" आलोक मेहता ओरडला. मला माझी जखडलेली मान हालवणं अशक्य होतं. शेवटी मी फक्त डोळेच तेवढे हालवून पाटी बघायचा प्रयत्न केला. दृष्टी शेजारणीच्या जटांत अडकली.
गाडी जी सुरू झाली ती न थांबता पळत राहिली. आधी राजमार्गावरून धावली. तेव्हा पाट्या दिसत होत्या. आधी थोड्या इंग्रजीसुध्दा होत्या. नंतर सगळया अरबीच पाट्या दिसल्या. आणि मग तर मैलोन्मैल नुसता रस्ताच! प्रवास रात्रीचा होता. कुठे चाललो आहोत याचा थांगपत्ता नव्हता. अठरापगड प्रांतातून आलेले आम्ही बाराजण केवळ राष्ट्रीय एकजुटीच्या मुठीत जीव धरून बसलो होतो. हळूहळू एकेकाला वाचा फुटली. बोलण्यातून फक्त भीती आणि वैतागच व्यक्त होत होता.

"कुठून झक मारली आणि या अरबांच्या देशात आलो!"

"आपल्याला घ्यायला कोण पाठवला असेल तर हा अडाणी माणूस. भेटल्यापासून

‘याल्ला’खेरीज बोलला नाही!"

"सुखाची नोकरी सोडून बसलो. तेवढे परतीचे दोर तरी कापता नये होते."

"मी तर कर्ज काढलं एजंटाचे पैसे द्यायला. ते लवकरात लवकर फेडायला हवं."

"या ढब्बोबाने आपली नावंसुध्दा विचारली नाहीत. शिरगणती तरी केली की नाही कोण जाणे"

"बारापर्यंत आकडे मोजता येत असतील तर करेल ना शिरगणती!"

"सगळया मनुष्यजातीला वीसपर्यंत गणती येते", आमच्या हुशार फिजियोथेरपिस्टने सामान्यज्ञानाचा धडा दिला.

आता याच मुद्द्यावरून वाद रंगला, भरात आला, रटाळ झाला. वादी पेंगले. प्रतिवादींना डुलकी लागली. निर्विवाद घोरण्याचाच विजय झाला.

अचानक गाडी थांबली.  पुन्हा "याल्ला"चा पुकार झाला. सगळे खडबडून जागे झाले.

"पोचलो वाटतं मुक्कामाला!"

"पण इथे तर हॉस्पिटलसारखं काहीच दिसत नाही. बाऽप रे! कुठल्या खेडेगावातल्या दवाखान्यात कामाला आणलंय की काय आपल्याला?"

"याल्ला! सुरासुरा!" ड्रायव्हर खेकसला.

"म्हणजे काय म्हणतोय हा अशिक्षित? तुमच्या मराठीत सुरा म्हणजे  knife  ना?" मल्याळी नर्सने विचारलं.

"हो, आणि दारूसुध्दा", मी अर्धवट झोपेत बरळले.

"हा कुठे नेतोय आपल्याला? आणि सामानाचं काय?"

"सोडा ना! एवढे जिवावर उदार होऊन भलतीकडे वाळवंटात आलोय. सामानाचं काय मोठं? सामान जाणार असेल तर आपलीही काही धडगत नाही या रानवट देशात."

ड्रायव्हरच्या मागोमाग गेलो. एक लिंपलेल्या भिंतींचं माळवदी घर होतं. एकमेकांच्या आधाराने कसाबसा तोल सावरत भूमितीचे सगळे नियम त्याच्या धाब्यावर बसले होते. सरळ रेषांचा पत्ता नव्हता. सगळीकडे काटकोनांवर काट मारले होते. प्रत्येक चौकट जमेल तेवढी वेडीवाकडी करायचा आटोकाट प्रयत्न होता सारा!  आतमध्ये कितीतरी ट्यूबलाईट्स लावून प्रकाश अक्षरशः चोंदला होता.

बाकी तिथली मोडकी टेबलं, तुटक्या खुर्च्या आणि एकंदरीत गावंढळ अरबी गर्दी पाहून येष्टीच्या ष्ट्यांडाची आठवण झाली. इतका वेळ लोटला होता तरी कळप सोडून टॉयलेटलासुध्दा जाण्याचं धाडस कुणाला करवेना.
मग समोर वाडगे-बशा आल्या. त्यांच्यात गरमागरम डाळ आणि गुबगुबीत रोट्या होत्या.

"मध्यरात्री? डाळरोटी?"

"मिळतंय तेव्हा खाऊन घ्या.  कोण जाणे पुढला घास कधी मिळेल ते! आणि मध्यरात्र कुठली? अगदी इकडचेसुध्दा तीन वाजलेत पहाटेचे. भारतात उजाडलं असेल."

"पुढ्यात आलेल्या अन्नाचा अपमान करू नये."

एकूण काय, कुरकुरत, नावं ठेवत का होईना, सगळयांनी खाऊन घेतलं. पैसे ड्रायव्हरनेच दिले.

तिथे शेजारीच एक छोटंसं किराणामालाचं दुकान होतं. 'हे राहिलंच घ्यायचं,' म्हणत मी तिथून सुईदोरा आणि सेफ्टीपिना विकत घेतल्या. सगळी मिळून साडेचार रियालची खरेदी. माझ्याकडे पाच रियाल होते. पण दुकानदाराने सुटे पैसे परत दिले नाहीत. आमच्या आडातच चुळकाभर पुंजी असताना ही पोहऱ्यात उपसलेली पसाभर वाया गेल्याचं दुःख झालंच. पण सौदीमध्ये सोनं अतिशय स्वस्त असतं असं ऐकलं होतं. वाटलं, 'न जाणों, त्या अर्ध्या रियालात एखादवेळ अर्धा-एक ग्रॅम सोनं आलं असतं.' जीव चुटपुटला.

मग पुन्हा गाडीत कोंबून बसलो. आता मात्र हुडिनीला मनातल्या मनात नमस्कार ठोकून मी हात-मान सोडवून घेतले. एव्हाना दिशा फाकल्या होत्या. अजून वाळूखेरीज काहीच दिसत नव्हतं. आता रस्ताही खराब होता. खड्डे होतेच. मध्येच एका बाजूचा रस्ता एकाएकी संपला. पुढे तर जेमतेम एका गाडीपुरतीच वाट राहिली. रस्त्याच्या कडेला बऱ्याच महागड्या गाड्या सोडून दिलेल्या होत्या. गाड्यांचं कबरस्तानच होतं ते! काहींची चाकं निखळली होती, काहींची नाकं चेपली होती, काही बापड्या गंजायला लागल्या होत्या.  फाटकेतुटके टायर्सही दिसत होते. रस्त्यावर जळक्या टायर्सचे फराटे उमटलेले होते. अधूनमधून मेंढरं दिसत होती. मानही वर न करता सतत चरायला त्यांना त्या वाळूत काय मिळत होतं कोण जाणे. बाकी सारं क्षितिजापर्यंत पसरलेलं बिनचेहऱ्याचं वाळवंट.

"आपलं गाव हिरवंगार आहे. हिरवळ दिसली की समजायचं, मुक्कामाला पोचलो!"

कितीतरी वेळ आणि अंतर असे जातच राहिलो. आणि मग एका चढावावर गेल्यावर एकाएकी खाली एक गाव दिसलं. रस्ता फक्त एकच, मध्यवर्ती तेवढाच. पण बरीच पक्की बांधलेली माळवदी घरं दिसत होती. पलीकडे वाळवंटात विखुरलेले तंबू होते. अधूनमधून खुरटी झुडपं होती.  खजुराच्या झाडांचे तुरळक पुंजके होते. एखाद्दुसऱ्या घरावर एखादा वेल चढवला होता. आणि मग एक अद्ययावत बांधणीचं हॉस्पिटल दिसलं. त्याच्या आवारात गाडी थांबवून आमचा ड्रायव्हर दिसेनासा झाला.

"पण हे आपलं हॉस्पिटल कसं असेल?  या गावात हिरवळ जवळजवळ नाहीच! आपलं गाव तर हिरवाईची आई आहे ना?"

"असेऽल गऽ," ह्यांनी समजूत घातली, "पण हिरवाई पितृमुखी असावी."
आम्ही उलटसुलट विचार करतोय इतक्यात एक फिलिपीन्सची मध्यमवयीन नर्स घाईघाईने आली आणि शुध्द इंग्रजीत म्हणाली, "चला चला, आधी चहापाणी घ्यायला चला. तुम्ही आत्ता प्रवासातून आला आहात म्हणून तुम्हाला खायची परवानगी आहे. नाहीतर सध्या रमादान( रमझान)मध्ये दिवसा कुणी काही खातपीत नाही."
ती आम्हाला मेसमध्ये घेऊन गेली.

"तुमचं झालं की तुम्हाला मुदीरना म्हणजे डिरेक्टरना भेटायला घेऊन जाते हं. सामान गाडीतच राहू दे. मग तुम्ही कुठे रहाणार ते एकदा ठरलं की तिथेच उतरवता येईल ते."

"हुश्श. आता कसं माणसात आल्यासारखं वाटलं! पण रमझान म्हणून त्या ड्रायव्हरने आपल्याला रात्री खाऊपिऊ घातलं. बिचारा. किती पदरमोड केली असेल ना! माणुसकी आहे त्याला. जमलं तर त्याचे पैसे परत करू हं. त्या हमालाचे द्यायचे राहिलेच बघा. पैसे कमावायला या देशात आलो तर अशी गरिबांना नाडून सुरुवात नको करायला," इति मी, अखंड आणि उदंड अपराधी.

"अग, तो ड्रायव्हर हॉस्पिटलचा नोकर आहे. हॉस्पिटलने दिले असणार पैसे त्याला. आणि तो तुझा हमाल आता कुठून भेटणार आपल्याला? सोड त्याचा विचार."

आता वाद घालायला वेळ नव्हता. चहापाणी झाल्याझाल्या त्या नर्सने आम्हाला हॉस्पिटल डिरेक्टरच्या ऑफिसमध्ये नेलं. ऑफिसबाहेरची वेटिंग रूम झकास होती. गुबगुबीत गालिचे, सोफ्यावरच्या लुसलुशीत गिरद्या, चकचकीत पॉलिश केलेली, पॅनेलवाली लाकडी दारं, भिंतीवरचं आकर्षक नक्षीकाम.... प्रत्येक गोष्टीत देशाची श्रीमंती झळकत होती. रात्रभर प्रवास केल्यावर, भरल्या पोटी, त्या मऊमऊ सोफ्यात खरं तर आम्ही पेंगुळलो असतो. पण आता नव्या देशाची, नव्या संस्कृतीची एक अनामिक भीती मनात दाटली होती. समोरच्या त्या लांबरुंद, बंद दारामागे दबा धरून बसलेलं अक्राळविक्राळ संकट आमच्यावर एकाएकी झडप घालणार असावं, अशीच काहीशी भावना छाती दडपून टाकत होती. आणि त्यातून अरबी शिष्टाचार घोकायची केविलवाणी धडपडही चालली होती.

"सलाम आलेकुम आधी म्हणायचं की वालेकुमस्सलाम? आणि ते अस्सल आम म्हणजे काय?"

"मला सांग, तो मुदीर काय तुझी अरबीची परीक्षा घेणार आहे का? तू इथे पेशंट तपासणार आहेस की अरबीचे पेपर? उगाच भलत्या काळज्या!" बापडा नवरा शेवटी वैतागून खेकसला.

इतक्यात ‘कर्र्र्..टण्ण्’, घंटा वाजली. ती मघाचीच नर्स समोरच्या लंब्याचौड्या दारातून अवतरली,

"डिरेक्टर तुमची वाट पहाताहेत", असं म्हणून ती निघून गेली.

तिथल्या श्रीमंती थाटाने भारावलेले आम्ही दबत, थबकत, घोळक्यानेच दाराकडे गेलो. शेवटी कुणीतरी धीर करून दारावर टक्टक् केलं. आतून अस्खलित इंग्रजीत शब्द आले,

"Yes, all of you can come in now. Welcome to Saudi Arabia. Welcome to Umm Khadra."

आम्ही दार ढकलून उघडलं आणि जागीच खिळलो. त्या प्रशस्त, राजेशाही ऑफिसातल्या महागड्या मध्यवर्ती  टेबलावर आमचे लखोटे होते आणि टेबलामागच्या सर्वात महत्वाच्या खुर्चीवर आमची वाट पहात बसला होता, आमचा कालचा अरबी हमाल!

*[डॉ. उज्ज्वला दळवी यांच्या, ग्रंथालीने प्रकाशित केलेल्या,* ***'सोन्याच्या धुराचे ठसके'*** *या पुस्तकातलं हे पहिलं प्रकरण. अत्यंत मागासलेल्या खेड्यापासून ते अद्ययावत उद्योगनगरीपर्यंतचा सौदी अरेबियाचा सामाजिक प्रवास जवळून बघण्याची संधी डॉ. दळवींना लाभली. त्या प्रवासातले जे अनुभव त्यांच्या मध्यमवर्गीय मराठी मनात ठसले किंवा ठसठसले तेच हे ठसके.]*